**ठळक बातम्या**

- विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना कालमर्यादा घालता येणार नाही, मात्र अनिश्चित काळासाठी विधेयक प्रलंबितही ठेवता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- जी २० शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर

- नितीश कुमार यांनी दहाव्यांदा घेतली बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ

- ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला गोव्यात उत्साहात सुरूवात

**आणि**

- विश्वचषक मुष्टियुद्ध स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिलांना सुवर्ण पदक

**<><><><><>**

विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेची मर्यादा घालता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील ५ न्यायाधीशांच्या संविधान पीठाने आज हा निवाडा दिला. संविधानातल्या या पेचावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला होता. त्यावर कालमर्यादा घालून देणं म्हणजे त्यांच्या अधिकारात हस्तक्षेप केल्यासारखं होईल आणि ते अयोग्य असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. पण विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपालांना विलंब होत असेल तर मर्यादित अधिकारांचा वापर करुन लवकर निर्णय देण्यासाठी न्यायालय राज्यपालांना निर्देश देईल, असंही पीठानं म्हटलं. विधेयकातल्या तरतुदी मान्य नसतील तर राज्यपालांनी ते

विधानसभेकडे परत पाठवावं किंवा राष्ट्रपतींकडे मार्गदर्शनासाठी पाठवता येईल. अनिश्चित काळासाठी विधेयक रोखून धरणं हे संघराज्य तत्वाचं उल्लंघन ठरेल, असं न्यायालयानं स्पष्टपणे नमूद केलं.

**<><><><><>**

जोहान्सबर्ग इथं होणाऱ्या जी २० शिखरपरिषदेला उपस्थित राहण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ३ दिवसांच्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातले आर्थिक व्यवहार सचिव सुधाकर दलेला यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. हा त्यांचा चौथा दक्षिण आफ्रिका दौरा आहे. आफ्रिकेत पहिल्यांदाच जी २० शिखरपरिषद होत आहे. या दौऱ्यात ते भारत- ब्राझिल- दक्षिण आफ्रिका अर्थात इब्साच्या नेत्यांच्या बैठकीलाही प्रधानमंत्री उपस्थित राहणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी अर्थसंकल्पपूर्व चर्चा केली. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी, मुख्य आर्थिक सल्लागार तसंच अर्थ आणि कामगार विभागांचे सचिव बैठकीला उपस्थित होते.

आज सकाळी त्यांनी पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रातल्या प्रतिनिधींशीही चर्चा केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नेटवर्क प्लॅनिंग ग्रूपची बैठक आज झाली. यात जुन्या पुणे नाक्यापासून राष्ट्रीय

महामार्ग ६५वर सोलापुरातल्या बोरामणि नाक्यापर्यंत चारपदरी उन्नत कॉरिडॉर बांधण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली.

<><><><><>

बिहारमधे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नव्या सरकारचा शपथविधी आज झाला. यात संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार यांनी दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

त्यांच्यासोबत सम्राट चौधरी, विजयकुमार सिन्हा, मंगल पांडे, नितीन नबीन, रामकृपाल यादव, श्रेयसी सिंह यांच्यासह २७ मंत्र्यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली. पाटणा इथं गांधी मैदानावर झालेल्या या शपथविधी सोहळ्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. तसंच हा सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

<><><><><>

नोव्हेंबर महिन्याच्या ४ तारखेला मतदार यादी पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा सुरू झाल्यापासून ५० कोटींहून अधिक गणना अर्ज वितरित केल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगानं दिली आहे. उत्तर प्रदेशात सर्वाधिक म्हणजे १५ कोटी ३७ लाख गणना अर्ज वितरित करण्यात आले आहेत. तर पश्चिम बंगालमध्ये ७ कोटी ६४ लाखांहून जास्त अर्ज वितरित झाले आहेतय दुसऱ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया सुरू असून पुढच्या महिन्यात ४ तारखेपर्यंत हा टप्पा सुरू राहील.

<><><><><>

गोव्यात ५६ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव – इफ्फी २०२५ – आज मोठ्या उत्साहात सुरू झाला. उद्घाटन समारोहाच्या आधी झालेल्या परेडमध्ये देशातल्या चित्रपट जगतातलं वैविध्य उपस्थितांना पहायला मिळालं. २०

ते २८ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवासाठी भारतासह जगभरातील चित्रपट मंडळ गोव्यात एकत्र आले आहेत. अधिक जाणून घेऊया आमच्या पणजी प्रतिनिधी कडून

***होल्ड VoiceCast***

*(आशियातील प्रतिष्ठित महोत्सवांपैकी एक असलेल्या इफ्फीमध्ये यंदा क्लासिक आणि आधुनिक सिनेमा एकत्र येणार आहे. जगभरातील चित्रपटांचे प्रदर्शन, मास्टरक्लासेस आणि खास कार्यक्रम यांचा आकर्षक मेळ यावेळी पाहायला मिळणार आहे.*

*उद्घाटन सोहळ्यात माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, मुख्यमंत्री प्रमोद सावंत, सचिव संजय जाजू, महोत्सव संचालक शेखर कपूर, तसेच अभिनेते बालकृष्ण, अनुपम खेर, आणि दिग्दर्शक राकेश ओमप्रकाश मेहरा उपस्थित होते. विविध राज्ये आणि चित्रपट उद्योगांचे देखणे चित्ररथही यावेळी सादर करण्यात आले.*

*डॉ. एल. मुरुगन यांनी भारताच्या “ऑरेंज इकॉनॉमी”चा उल्लेख करत, इफ्फी 2025 आणि WAVES या महोत्सवांमुळे क्रिएटिव्हिटी, कंटेंट आणि कल्चर—या तीन स्तंभांना नवी ऊर्जा मिळत असल्याचे सांगितले.)*

इफ्फीमध्ये सकाळी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन यांनी वेव्हज फिल्म बाजारचं उद्घाटन केलं. हा फिल्म बाजार युवकांसाठी आणि नव्या दिग्दर्शक निर्मात्यांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो आणि भारतीय चित्रपट कथांचं जगासमोर सादरीकरण करतो असं मुरूगन यावेळी म्हणाले. यावेळी कोरियाच्या खासदार जेवोन किम यांनी गायलेल्या वंदे मातरम् नं सगळ्यांना आश्चर्यचकित केलं…

**होल्ड - वंदे मातरम**

**<><><><><>**

इंग्लंडमधला शस्त्रास्त्र तज्ज्ञ संजय भंडारी याच्याशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणात ईडीनं रॉबर्ट वड्रा विरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. भंडारीच्या हस्तांतरणाची मागणी ब्रिटनमधल्या न्यायालयाने फेटाळल्यानंतर ईडीने त्याला फरार घोषित केलं. वड्राविरुद्ध हे दुसरं आरोपपत्र असून यापूर्वी ईडीनं हरियाणातल्या शिकोहपूर जमीनव्यवहार प्रकरणात गेल्या जुलैमधे पहिलं आरोपपत्र दाखल केलं होतं.

**<><><><><>**

ईडीच्या विशेष कृती दलानं उद्योजक अनिल अंबानी यांच्या मालकीच्या काही इमारती जप्त केल्या आहेत. नवी मुंबईतल्या धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी आणि मिलेनियम बिझनेस पार्कमध्ये या इमारती आहेत. याशिवाय पुणे, चेन्नई, भुवनेश्वरमधल्याही काही इमारती आणि मोकळ्या जागा ईडीनं जप्त केल्या आहेत.

**<><><><><>**

दिल्ली स्फोट प्रकरणी एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने आज चार जणांना अटक केली. या आरोपींना श्रीनगरमधून ताब्यात घेतल्याचं एनआयएने सांगितलं.

**<><><><><>**

नेपाळ सीमेवरती असलेल्या बारा या जिल्ह्यात आज नवयुवकांच्या गटाने युवा आणि नेपाळच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांमधल्या संघर्षाचा निषेध केला. कालही या संदर्भात झालेल्या निदर्शनांमध्ये संघर्ष निर्माण होऊन काही तरुण जखमी झाले होते.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या नॉयडा इथं विश्वचषक मुष्टियुद्ध स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज अरूंधती चौधरी, प्रीति पवार, मीनाक्षी हुडा आणि नुपुर शेरॉन या भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी सुवर्ण कामगिरी केली. ७० किलो वजनी गटात अरूंधतीनं उझबेकिस्तानच्या अझिजा झोकिरोवाचा ५-० असा सपशेल पराभव केला. प्रीतिनं ५४ किलो वजनी गटात इटलीच्या सिरीन छाराबीचा ५- ० असा धुवा उडवला. मीनाक्षीनं ४८ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या फोझिलोवा फरझोनाला ५-० असं सहज पराभूत केलं. नुपूरनं ८० किलोहून अधिक वजनी गटात उझबेकिस्तानच्या ओल्टिनॉय सोटिमबोवाला नमवलं. एकीकडे महिलांनी भारताला चार सुवर्णपदकं मिळवून दिली तर भारताचे चार मुष्टियोद्धे अंकुश पांघल, अभिना**ष**

जामवाल, पवन बर्तवाल आणि जादुमणि सिंग हे अंतिम सामन्यांत हरल्यामुळे भारताला चार रौप्यपदकांवर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

जपानमध्ये टोक्यो इथं सुरू असलेल्या कर्णबधिरांच्या ऑलिंपिक स्पर्धेत भारतीय गोल्फपटू दीक्षा डागर हिने सुवर्णपदक मिळवलं आहे.

**//<><><><><>//**